महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-८ अंक-२ एप्रिल-मे -२०१४

**Dear Colleague,**

Ours is Public Service organization. We have to function in the set policy framework of the Government. Since we are into regulated business, we have to work in set parameters of our regulators i.e. MERC. Our affairs are subject to Government Audits. Therefore we must do work diligently such that there is no loss for any wrong doing to the Company.

In this regard our Finance and Accounts Department plays pivotal role and ensures overall surveillance on our transactions. Now-a-days the role has become substantial in respect of maintaining liquidity, fund flow management, raising short/ long term finance, follow-up with MSEDCL for payments, seeking ARR approval from MERC, compliances, etc.

Ours is peculiar business where our regulator allows us cost plus tariff. Thus we need to be more conscious regarding our cost. No control on our expenditure will result in to erosion of Return on Equity, which in turn affect our capital expenditure for infrastructure development. Our company funds equity portion of its capital expenditure through internal resources. It does not burden our equity holder Government of Maharashtra for capital expenditure requirement for infrastructure development.

By effective monitoring of revenue budget and fund flow, our company tries to run our operations within parameters set by MERC and also sees that borrowing for working capital is within set norms. As a result transmission tariff remains bare minimum so that the end customer is not burdened with inefficiency or unreasonable cost of transmission operations.

Our financial results are improving year on year which is result of our operational and management efficiency. In the previous financial year, we recorded our Total Income of Rs. 5,500 crores approx. Our Finance and Accounts Department also succeeded in seeking past period revenue gap recovery of Rs. 877 crores of the previous financial year. This has resulted in to impressive profitability of our company for the financial year 2013-2014.

To have further improvements in our internal operations, the F&A Department taken lead and sought revision in Delegation of Powers for minimum publicity period, minimum Technically qualifying bids and acceptance of tender for offers received above specific percentage of estimated cost, to bring fair and reasonable competition. Besides it monitors procurement at various levels to optimize the cost.



The role of an Internal Audit has been made more comprehensive which is in line with new changes in the Company's Act to ensure effective internal checks and control. The non-compliance is being reported to the top management which ensures financial discipline in the organization and avoids any wasteful expenditure.

Recently a Monthly Management Information System has been designed through which up-dates are sent to the top management in respect of Revenue, Arrears, R&M and Capital Expenditure, Sale of Scrap, Bank Guarantee, etc. It has helped in improving our review and monitoring mechanism.

Due to effective management of fund flow and constant follow-up with MSEDCL, even in the scenario of huge arrears from Discom & regulators, timely serving of debts, timely payment of statutory and staff dues are ensured. Similarly suppliers' claims are also settled in time.

New changes are taking place in power sector. It is likely to become more vibrant and competitive. It is essential to be self-reliant as far as our financial need is concerned. We must keep this good practice of not burdening our equity holder i.e. Government of Maharashtra for our financial need. At the same time we must be committed in fulfilling our mandate of providing reliable, uninterrupted and affordable, power to all.

I solicit all your co-operation in this regard and appeal to fulfill all commitments in maintaining financial discipline in our organization. Let us not forget the phrase "Money Saved is Money Earned".

With Best Wishes!!!

**(Bipin Shrimali)**
**Chairman and Managing Director**

## मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांची अऊदा बां.नि.संवसु., पुणे परिमंडलास भेट





आपल्या महापारेषण कंपनीमध्ये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदी नियुक्त झाल्यानंतर सन्माननीय श्री.बिपीन श्रीमाळी यांनी अऊदा बां.नि.संवसु, पुणे परिमंडलास दि. १०.०४.२०१४ रोजी प्रथम भेट दिली.

परिमंडलातर्फे श्री.प्रभाकर देवरे, मुख्य अभियंता यांनी मा.श्री.बिपीन श्रीमाळी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वागत केले.

मा.अध्यक्षांनी पुणे परिमंडलांतर्गत विविध प्रकल्पीय कामांचा आढावा यावेळी घेतला. मुख्य अभियंता यांनी चित्रफीतीद्वारे पुर्ण झालेले विविध प्रकल्प, सुरु असलेले व नव्याने सुरु होणारे प्रकल्पाची माहिती, मा.अध्यक्षांना यावेळी अवगत केली. पुणे परिमंडल हे सॅप/ई.आर.पी. प्रणाली प्रभावी व यशस्वीपणे राबवित असल्याबद्दल मा.अध्यक्षांनी समाधान व्यक्त केले.

सदर भेटीदरम्यान मा.अध्यक्षांनी पुणे येथील महत्वाकांक्षी १३२ केव्ही जी.आय.एस. उपकेंद्रास भेट देवून अद्ययावत प्रणालीद्वारे कार्यरत असलेले उपकेंद्राचे वीज पारेषणाचे कामाबाबत तसेच वीज पारेषणाबाबत वितरण कंपनीशी करत असलेल्या समन्वयाबाबत समाधान व्यक्त केले.

यावेळी महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता श्री.निळकंठ वाडेकर यांनी तसेच विविध कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधींनी मा.अध्यक्षांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.





## PRIZE DISTRUBUTION FOR 'SLOGAN COMPETITION' : FIRE SAFETY WEEK 14-20 APRIL 2014

The Government of India, in recognition of those firemen who sacrificed their lives in Mumbai Dock Explosion in the year 1944 and firemen all over the country who lay down their lives during fire fighting action has decided to observe 14th "April as Fire Services Day" every year to pay tribute and remember those brave and dedicated souls.

At MSETCL 'fire week' is observed every year to reinforce the need of 'fire safety' and increase awareness about it. As a part of the curriculum this year, a slogan competition was organised to promote fire prevention activities and to create fire safety awareness amongst the employees at the Corporate Office.
The details of the slogan competition are as listed below:-

| Language | Winner | Runners Up |
|---|---|---|
| Marathi | ''आगी'' पासून सुरक्षा, तुमचे वापरा तंत्र '' सुरक्षा नियम'' संभाळा. सफल जीवनाचा हाच तंत्र.*<br>- कु.स्मिता वंजारी, उप व्यवस्थापक (मासं.), सां.का., मुंबई | ----------- |
| Hindi | ''जान है तो जहान है इसलिये आगसे सुरक्षा महान है''<br>- श्री.ईमाम आर.सिद्दिकी, सहा. महा व्यवस्थापक (मासं), सां.का., मुंबई | ''मुश्किलों से भाग भाग जाना आसान होता है, हर पैहलु जिंदिगी का इम्तीहान होता है, आग को पनपने से / बढने से रोको दोस्तों क्योंकी, आग से लढना मौतसे इम्तींहान होता है.''<br>- कु.स्मिता वंजारी, उप व्यवस्थापक (मासं.), सां.का., मुंबई |
| English | "Be a fire safety hero; score a fire accident zero."<br>-Smt. Havisha V Jagtap, Sr. Manager, (HR), C.O., Mumbai | "Fire accident brings tears; fire prevention brings cheers and so, handle fire with care and live life without fear."<br>- Ms Smeeta Vanjari, Dy. Manager (H.R.), C.O., Mumbai |

*Sole entry

As mark of encouragement prizes were distributed to the winners of the slogan competition by Shri Subhash G Kelkar, Executive Director (Operations) MSETCL.

## महापारेषणचा "ERP-SAP" प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाचा E-Governence पुरस्कार





मा. मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते दि. १ मे २०१४ रोजी पारीतोषीक स्वीकारताना मा.श्री.बिपीन श्रीमाळी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण, ERP-SAP प्रकल्पाचे प्रमुख, श्री. एस.टि. शिंदे, मुख्य अभियंता (मासंवि) व त्यांचा चमु श्री.आनंद गायकवाड (सहा. अभियंता, ERP), श्री.श्रीकांत जाधव (उप. कार्य. अभियंता), श्री .विशाल वाघचौरे (उप. कार्य. अभियंता), श्री.सुरेश पनीकर (उप. कार्य. अभियंता ), श्री.राजु गायकवाड (सहा. महाव्यवस्थापक-मासं), श्री.सुनिल सुर्यवंशी (अधीक्षक अभियंता ), श्री. प्रमोद देशपांडे (कार्यकारी अभियंता), श्रीमती.लिना कसरेकर (सहा. महाव्यवस्थापक-विवले) छायाचित्रात दिसत आहे.

परिवर्तन घडवणे एक आव्हान असते त्याकरीता ध्येयवादी राहून मोठे संघटन तयार करावे लागते. संघटनेस वेळेनुसार सक्षमीकरुन त्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करणे व तसेच त्यांना लागणाऱ्या सांधनांची उपलब्धता करुन देणे हे त्यास नेतृत्व करणाऱ्यांची जबाबदारी असते.

सतत पाठपुरावा व आढावा घेत अनेक अडचणींवर मात करत प्रकल्पाची ठरविण्यात आलेले कामगीरीचे टप्पे गाठावयाची असतात.

महापारेषण कंपनीत ERP-SAP प्रकल्प एक चळवळ म्हणून उभी ठाकली. सरकारी आस्थापनेत ERP शक्य होणार नाही असे त्यावेळी अनेकांना वाटत असे. मात्र हे स्वप्न अस्तीत्वात आणण्याचा आग्रह व्यवस्थापनाने धरला व त्यानुसार प्रकल्पाला सहकार्य व पाठबळ दिले.

आज देशातील पारेषण कंपन्यांतील महापारेषण कंपनीने ERP प्रणाली कार्यान्वीत करुन आदर्श ठरण्याचा व पहिल्या येण्याचा बहुमान पटकावला. अनेकांचे श्रम, चिकाटी, वेळ व उत्कृष्ट प्रकल्प व्यवस्थापन आजच्या आपल्या यशाला कारणीभूत आहेत.

नोव्हेंबर २००८ मध्ये सुरु झालेल्या मोहिमेला त्यांच्या मूर्त स्वरूपात आणावयास तीन वर्षे लागली. जानेवारी २०१२ मध्ये कंपनींने Go-Live हा कामगीरीच्या महत्वाच्या टप्पा गाठला. तद्नंतर कंपनीने यशस्वीरीत्या ERP-SAP प्रणाली दैंनदिन वापरात आणली.

आज हया प्रणालीमुळे कंपनीच्या कार्याला वेग आला व कार्यपध्दतीमध्ये बदल व पारदर्शकता आली. महाराष्ट्र शासन E–Government पुरस्कर्ते विभागाने कार्यप्रणाली मध्ये बदल व पारदर्शकता आणणाऱ्या कंपनी करीता असणाऱ्या पारीतोषीक योजने अंतर्गत महापारेषण कंपनीच्या कार्याची दखल घेण्यात आली.

दि. ०१ मे २०१४ रोजी महाराष्ट्र शासनाचा मुंबई येथील सहयाद्री अतीथी गृहात भव्य कार्यक्रमात मा.मुख्यमंत्री. श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते रजत पुरस्कार प्रकल्प परिवर्तन ERP-SAP चे वितरण करण्यात आले. त्यावेळेस महापारेषण कंपनीचा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री.बिपीन श्रीमाळी तसेच प्रकल्प प्रमुख श्री.संजय शिंदे, मुख्य अभियंता (मासंवि) हे ERP-SAP चा चमुसह उपस्थित होते.

भारतातील इतर पारेषण कंपन्यांमध्ये ERP-SAP प्रणाली कार्यान्वित करण्या करिता महापारेषणकडे विचारणा होत आहे.

## OPGW Progress



In a move to develop robust, reliable, resilient communication system, MSETCL is installing OPGW (Optical Fiber Composite Ground Wire) cable along the EHV Transmission line. The work has been taken up forming a joint venture company with Sterlite Industries Ltd in name of MTCIL . The share pattern of both partner is 51:49(51% STL and 49% MSETCL). This type of installation is said to be almost maintenance free. The work is in full swing and as of date 234KM stringing of cable is completed in live line mode. The OPGW route at present is taken for 2800KM with node equipment at 48 locations. This is beginning of a innovative type of communication system. Once the services are optimized on this system then MSETCL has to go a long way to connect its various substations and other desired locations on this system. Nonetheless to say that this solution has a very economic electronics which may be many fold less than the existing PLCC terminals.

If we look at worldwide scenario then Canada, etc has done this project long back and reaping its benefits. In India PGCIL has already crossed a figure of 30,000 Km of OPGW installation. Other state transmission utilities are also following same suite. Once the full fledged network of 48F cable is established then MSETCL also would have the commercial edge through its joint venture company MTCIL( Maharashtra Transmission Communication Infrastructure Ltd) by leasing 40 Fibers for commercial exploitation and 8 Fibers dedicated for the robust communication of MSETCL.

## अतिउच्च दाब बांधकाम व सुव्यवस्था परिमंडळ, अमरावती द्वारा मार्च २०१४ पर्यंत २२०केव्ही घाटोडी, २२०केव्ही वरूड व १३२केव्ही मुर्तिजापूर अतिउच्चदाब प्रकल्प कार्यान्वित



१३२ केव्ही मूर्तिजापूर उपकेंद्रामधील आर.टी.यु. स्काडा कार्यान्वित करतांना मा.श्री.बी.टी. राऊत, मुख्य अभियंता व उपस्थित मान्यवर



अमरावती परिमंडळातर्फे मार्च २०१४ मध्ये विविध नवीन अतिउच्च दाब प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने २२०केव्ही घाटोडी उपकेंद्र (स्थापित क्षमता-३०० एमव्हीए.) व संबंधित २२० केव्ही लिलो लाईन (३२.६८२ परिपथ मिमी) (एकूण प्रकल्पाचा खर्च रु. १९८.४२ कोटी) २२० केव्ही वरूड उपकेंद्र (स्थापित क्षमता २०० एम.व्ही.ए.) संबंधित १३२केव्ही लिलो वाहिनी (१८ परीपथ किमी) (एकूण प्रकल्पाचा खर्च रु. ६४.२० कोटी) व १३२केव्ही मुर्तिजापूर उपकेंद्र (स्थापित क्षमता-५० एमव्हीए) व संबंधित १३२ केव्ही अकोला-मुर्तिजापूर वाहिनी (४० परिपथ किमी) (एकूण प्रकल्पाचा खर्च रु. ४६०३ लक्ष) व १३२ केव्ही जामबाजार येथील १० एमव्हीए १३२/३३ केव्ही रोहीत्राची २५ एमव्हीए १३२:३३ केव्ही ने क्षमता वाढ (एकूण प्रकल्पाचा खर्च रु. २४१ लक्ष) यांचा अंतर्भाव आहे. यामुळे अमरावती परिमंडळाला सन २०१३-१४ दरम्यान दिलेले उद्दिष्टे पूर्ण करण्यात यश आले.

वरील प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरिता अनेक अडचणींना समोर जावे लागले जसे की, मार्ग अधिकाराचे कोर्ट केसेस व जमिन मोबदलाबद्दलचे अवाजवी दावे व प्रसंगी शेतकऱ्यांचा व स्थानिक नागरिकांचा प्रचंड असंतोष. हे सर्व अडथळे कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नाने व अधिकाऱ्यांच्या योग्य मार्गदर्शनाने पार करण्यात कपंनीला यश आले.

वरील प्रकल्प कार्यान्वित झाल्यामुळे अमरावती परिमंडळातील विद्युत प्रणाली मध्ये बरीच सुधारणा अपेक्षित असून त्याचा फायदा या परिमंडळातील सर्व प्रकारच्या ग्राहकांना होणार असून या क्षेत्रातील औद्योगिक व हरीत क्रांती होण्याकरिता फायदेशीर ठरणार आहे.

वरील प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी मा.श्री. बिपीन श्रीमाळी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मा.श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प/संचलन), मा.श्री. रविंद्र चव्हाण, प्रभारी कार्यकारी संचालक, मा.श्री.बी.टी. राऊत, मुख्य अभियंता, मा.श्री.वंदन मेंढे, अधीक्षक अभियंता, मा.श्री.यशवंत गजभिये, अधीक्षक अभियंता, मा.श्री.वासुदेव खाडे, अधीक्षक अभियंता, मा.श्री. रविंद्र तिजारे, अधीक्षक अभियंता, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व कार्यकारी अभियंते श्री.प्रफुल्ल औघड, श्री.सुधीर ढवळे, श्री.रूपेश फरकाडे, श्री.महेंद्र कांबळे, श्री.अंबादास जाधव, श्री.प्रदिप देशपांडे, श्री.जीवन सरदार, श्री.सुरेश पाठक, श्री.अशोक सावदे, श्री.सुनिल शेरेकर, श्री.अरविंद डवरे, श्री.प्रकाश किनगावकर व सर्व संबंधित कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

## कराड परिमंडलांतर्गत १३२-११०/३३केव्ही, २५एमव्हीए रोहीत्र ११०केव्ही उपकेंद्र सावळज येथे कार्यान्वित



कराड परिमंडलांतर्गत एम.बी.आर. ७५/८ नुसार उपकेंद्र क्षमता वाढविणे या योजनेअंतर्गत सांगली विभागातील ११०केव्ही सावळज उपकेंद्र येथे १३२-११०/३३ केव्ही २५एमव्हीए रोहीत्राचे काम ठरवून दिलेल्या तारखेपूर्वी म्हणजेच मार्च २०१४ पूर्वी करण्यात आले. सदर कामाकरिता मुख्य अभियंता श्री.मुंडे, अधीक्षक अभियंता श्री.एस.जी. भोळे व श्रीमती कुंभार एस.एस. यांचे मार्गदर्शन लाभले.

सदर रोहीत्र कराड परिमंडलाचे मुख्य अभियंता, श्री.जी.टी. मुंडे यांच्या हस्ते यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आले. या प्रसंगी अधीक्षक अभियंता श्री.एस.जी. भोळे, श्रीमती कुंभार एस.एस., कार्यकारी अभियंता, श्री.कोळी सी.एल., श्री.ए.के. ढापरे, उपकार्यकारी अभियंता, श्री.संदीप जाधव तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मुख्य कार्यालयात महात्मा श्री.बसवेश्वर महाराज जयंती साजरी



सांघिक कार्यालय, मुंबई येथे ०२ मे २०१४ रोजी महात्मा बसवेश्वर जयंती मोठया उत्साहाने साजरी करण्यात आली. या प्रसंगी संचालक (प्रकल्प), श्री.ओ.के. एम्पाल यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन वंदन केले. या कार्यक्रमास सांघिक कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहिले व महात्मा बसवेश्वराच्या प्रतिमेला पुष्पाजंली वाहून वंदन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. सुगत गमरे महाव्यवस्थापक (मासं-ता) यांनी महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक कार्याची माहिती देवून त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

## ''महाराष्ट्रदिन'' मुख्य कार्यालयात उत्साहात साजरा



महापारेषण चे मुख्य कार्यालय, प्रकाशगंगा, येथे दिनांक १ मे २०१४ रोजी श्री. ओ.के. एम्पाल, संचालक (प्रकल्प) यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाला मानवंदना देवुन ''महाराष्ट्र दिन'' मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्राच्या हुतात्म्यांना मानवंदना देण्याचा हा दिवस आहे.मुंबई राजधानीसह महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. त्यासाठी १०५ हुतात्म्यांनी प्राणाची आहुती दयावी लागली. १ मे १९६० मराठी जनतेच्या आयुष्यातला परमभाग्याचा व आनंदाचा दिवस आहे. १ मे हा दिवस ''कामगार दिन'' म्हणुन सुध्दा साजरा केला जातो.

## ३९व्या अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळाचा क्रिडांस्पर्धामध्ये महापारेषण कंपनीतील खेळाडू कर्मचाऱ्यांचे यश




**महापारेषचा कुस्ती संघ डावीकडून शाहजी कामळे (कास्य पदकाचे मानकरी) कराड झोन, सुनील देवकाते, औरंगाबाद झोन, जी.आर. मेंढके, कराड झोन, प्रविण पाटील (संघ व्यवस्थापक), मुख्य कार्यालय, वाय.एस. बीडगर, औरंगाबाद झोन, एस.जे. मोमीन, औरंगाबाद झोन, पोपट वेताळ, कराड झोन, शंभाजी पाटील (रौप्य पदकाचे मानकरी), कराड झोन**

३९व्या अखिल भारतीय विद्युत क्रिडी नियंत्रण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या विविध खेळांच्या क्रीडा स्पर्धा वेगवेगळ्या राज्यांमध्ये पार पडल्या महापारेषण, कंपनीतर्फे बास्केटबॉल, बॅडमिंटन (पुरुष व महिला), कॅरम व कुस्ती या संघांनी वरील स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला होता. त्यापैकी अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळच्या वतीने हरियाणा पावर स्पोर्ट्स ग्रुप यांनी पंचवुला येथे ''कुस्ती''च्या स्पर्धांचे दि. ०८.०३.२०१४ ते दि. १०.०३.२०१४ या कालावधीत आयोजन केले होते. त्यामध्ये महापारेषणच्या सर्व मल्लांनी कसुन मेहनत करून स्पर्धेमध्ये यशस्वी होण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. त्यापैकी ९७ किलो वजन गटात, श्री.संभाजी पाटील, कराड झोन व १२५ किलो वजन गटात श्री.शहाजी कांबळे, कराड झोन यांना अनुक्रमे रौप्य व कास्य पदक मिळविण्यात यश आले. महापारेषणचा कुस्तीचा संघाने मार्चपास्टमध्येसहभाग केला. कॅरम व कुस्ती या दोन संघाचे संघव्यवस्थापक म्हणून श्री.प्रविण पाटील, कामगार विभाग, मुख्य कार्यालय, मुंबई यांनी उत्तम प्रकारे कामगिरी पार पाडली.

वरील सर्व स्पर्धेसाठी महापारेषण कंपनीचे कार्यकारी संचालक (मासं), श्री.सुभाष केळकर आणि मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, श्री.अनंत पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## १ ३ २ केव्ही उपकेंद्र सोयगाव येथे अग्निशामक उपकरणाचे प्रशिक्षण संपन्न



महापारेषणच्या औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता, श्री.रोहिदास म्हस्के यांनी बैठक घेऊन अग्निशामक उपकरणाची कार्यशाळा घेण्याचे सर्वांना सूचित केले.

दि. ०७ मे २०१४ रोजी महापारेषणच्या १३२ केव्ही सोयगांव उपकेंद्रामध्ये उपकरणांना आग लागल्यांनतर कोणत्या व कशा प्रकारच्या उपाय व योजना कराव्या यासंबंधीची कार्यशाळा औरंगाबाद अ.उ.दा (सं.व.सु.) महापारेषण मंडळाचे अधीक्षक अभियंता, श्री.एस.एन. कादरी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

१३२ केव्ही सोयगांव उपकेंद्रामध्ये मागील वर्षी रोहित्रास आग लागली होती त्या पार्श्वभूमीवर ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यासाठी कार्यकारी अभियंता, श्री.एम.डी.बनसोडे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले.

म.न.पा. अग्निशामक केंद्र, जळगांव यांच्या सहकार्याने हेड फायरमन, श्री.सुनिल मोरे व फायरमन, श्री.भारत बारीक यांनी अग्निशामक उपकरणांची कर्मचाऱ्यांना सविस्तर माहिती दिली, उपकरणे कसे हाताळावी हे सांगितले व प्रात्याक्षिक करून दाखविली.

सदर कार्यक्रमास औरंगाबाद विभागातील उपकार्यकारी अभियंता डॉ.श्री.नितिन झोपे, सर्व उपकेंद्र प्रमुख तसेच २२० केव्ही भोकरदन व १३२ केव्ही सिल्लोड व पिशोर उपकेंद्र येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

१३२ केव्ही सोयगांव उपकेंद्र येथील सहाय्यक अभियंता श्री.नितीन व्यवहारे व उपकेंद्रातील यंत्र चालक श्री.पाचपोहे, श्री.तडवी व कनिष्ठ तंत्रज्ञ श्री.धनवट, श्री.सादिक, श्री.पाटील यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.प्रविण महाजन, सहाय्यक अभियंता, १३२ केव्ही सिल्लोड यांनी केले.

# गौरव



### कर्तृत्ववान महिला म्हणून निवड

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, सोलापूर यांच्या वतीने कामगार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या कर्तृत्वान महिलांचा सत्कार संमारंभ दिनांक ११.०३.२०१४ रोजी आयोजीत करण्यात आला. या सत्कार समारंभात कर्तृत्ववान महिला म्हणून सौ. कस्तुरी विजय पुजारी , उप व्यवस्थापक (वि.व ले), अ.उ.दा स .व. सु मंडळ कार्यालय, सोलापुर यांची निवड करण्यात आली त्याबद्दल त्यांचे मनपुर्वक अभिनंदन!



### कुमारी मधुरा मोहन कुथे हीचे अमेरीकेस प्रयाण

महापारेषण कंपनीत भारप्रेषण केंद्र अंबाझरी (नागपूर) येथे कार्यरत उपकार्यकारी अभियंता श्री.मोहन श्रीनिवास कुथे ह्यांच्या मुलीने नासातर्फे वर्ष २०१४ करिता घेण्यात आलेल्या ''स्पेस सेटलमेंट डिझाईन कॉन्टेस्ट'' मध्ये भाग घेऊन ९व्या वर्गाच्या गटात द्वितीय पारितोषिक पटकावले आहे व दिनांक १४ मे ते १८ मे २०१४ रोजी लॉसएंजेलीस अमेरीका येथे होत असलेल्या परिषदेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रयाण केले आहे.

सदर स्पर्धेमध्ये जगभरातून आलेल्या १५६७ विद्यार्थ्यांच्या सहभागातून ९वा वर्ग गटात कु.मधुराने यश प्राप्त केले आहे.

महापारेषणतर्फे कु. मधुराचे हार्दिक अभिनंदन!



### कु. मुकेश सुरेश देवगुणे याचा माध्यमिक शालांत परिक्षेतील सुयश

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र ऐरोली (कळवा) येथील कार्यकारी अभियंता, श्री.एस.डी. देवगुणे, यांचे सुपुत्र कु. मुकेश सुरेश देवगुणे, याने मार्च २०१४च्या माध्यमिक शालांत परिक्षेत (इ.१०वी) इंग्रजी माध्यमातून ९२.२० टक्के मार्क मिळवून, सरस्वती विद्यालय, सेक्टर ५, ऐरोली, नवी मुंबई मधून तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल त्याने आपले शिक्षक, आई, वडील यांना श्रेय दिले आहे. या यशा बद्दल त्याचे महापारेषण कंपनीतर्फे अभिनंदन!



### कु.ऋता जयंत कुलकर्णी हिचा माध्यमिक शालांत परिक्षेतील सुयश

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली (कळवा) येथील अधीक्षक अभियंता, श्री.जयंत रा. कुलकर्णी यांची सुकन्या कु.ऋता जयंत कुलकर्णी, हीने मार्च २०१४च्या माध्यमिक शालांत परिक्षेत (इ.१०वी) इंग्रजी माध्यमातून ८९.९० टक्के मार्क मिळवले या यशाबद्दल तीने आपले शिक्षक, आई, वडील यांना श्रेय दिले आहे. या यशा बद्दल त्याचे महापारेषण कंपनीतर्फे अभिनंदन!

## ज्ञानदीप प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, महापारेषण चंद्रपुर येथे कनिष्ठ अभियंता यांचे ४० दिवसांच्या Induction Level प्रशिक्षणाचे यशस्वीरित्या आयोजन



सोमवार दि. २१.०१.२०१४ रोजी ''ज्ञानदीप'' नागपूर परिमंडलीय, महापारेषण प्रशिक्षण केंद्र एचव्हिडीसी गेस्ट हाऊस परिसर, चंद्रपूर येथे नविन भरती झालेल्या कनिष्ठ अभियंत्यांची ४० दिवसांच्या प्रशिक्षणाला सुरवात झाली. प्रशिक्षण उपक्रमाच्या उद्‌घाटन समारंभाला मा.शिंदे साहेब, मुख्य अभियंता (मासंवि) हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे प्रमुख पाहुणे म्हणून मा.मेंढे साहेब, तत्कालीन अधीक्षक अभियंता, (प्रशिक्षण) उपस्थित होते. याप्रसंगी श्री.शिंदे साहेब यांनी ''प्रशिक्षणावर होणारा खर्च हा खर्च नसुन ती महापारेषण कंपनीच्या उज्वल भविष्यासाठी योगदान देणाऱ्या व पाया असणाऱ्या कनिष्ठ अभियंता यांच्यासाठी केलेली गुंतवणुकच आहे''. त्यामुळे या प्रशिक्षणाचा उपयोग करून प्रशिक्षणार्थींनी कौशल्य वाढवावे असे आवाहन केले. त्याचप्रमाणे श्री.अणे साहेब, अधीक्षक अभियंता, एचव्हीडीसी ग्र.के. संवसु. प्रविभाग, चंद्रपुर तसेच श्री.निंबाळकर साहेब, सारडे साहेब, रॉय साहेब, बन्सोड साहेब (कार्यकारी अभियंता, एचव्हीडीसी प्रविभाग, चंद्रपुर) प्रामुख्याने उपस्थित होते. या प्रशिक्षणाला संपुर्ण महाराष्ट्रातून महापारेषणच्या विविध क्षेत्रातून कनिष्ठ अभियंता प्रशिक्षणासाठी आलेले होते.

या ४० दिवसांच्या प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना विविध विषयांवर प्रशिक्षण देण्यासाठी महापारेषण मधील व बाहेरील तज्ञ प्रशिक्षकांना बोलविण्यात आले होते. त्या प्रशिक्षणाचा अभियंत्यांनी आपले ज्ञान वृध्दींगत करण्यासाठी पुरेपुर उपयोग करून घेतला. या प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना नाविण्यपूर्ण पध्दतीने प्रशिक्षण देण्यात आले. उदा. प्रशिक्षकाने विशिष्ट विषयावर प्रशिक्षण दिल्यानंतर लगेच त्यासंबंधी साईट व्हिजीट त्याच दिवशी आयोजित करण्यात आली. या प्रशिक्षण कालावधीत जास्तीत जास्त साईट व्हिजीट वर भर देण्यात आला. प्रशिक्षण प्रशिक्षणार्थींना ५००केव्ही एचव्हीडीसी टर्मिनल उपकेंद्र, ४००केव्ही. चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, सोलर उपकेंद्र चंद्रपूर, भार प्रेषण वाहिनी केंद्र अंबाझरी, विश्वास पावर ट्रांसफार्मर रिपेअरिंग वर्कशॉप नागपूर, ३३ केव्ही इलेक्ट्रोड स्टेशन चिंचोली, ४०० केव्ही इएचव्ही आणि ५०० केव्ही एचव्हीडीसी लाईन, २२० केव्ही वरोरा उपकेंद्र सोबतच बाबा आमटे यांचे कुष्ठरोग्यांसाठी वसविलेले आनंदवन इ. अशाप्रकारे ११ साईटची व्हिजीट करण्यात आल्या.

यापुर्वी या प्रशिक्षण केंद्रामध्ये फक्त वर्ग ३ व वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात येत होते, कनिष्ठ अभियंता यांची इंडक्शन लेवल बॅच झालेली नव्हती. तरीसुद्धा श्री.केळकर साहेब, कार्यकारी संचालक (मासं) श्री.शिंदे साहेब मुख्य अभियंता (मासंवि) व श्री.सोनकवडे साहेब, मुख्य अभियंता, नागपुर परिमंडळ यांच्या प्रेरणेने व सतत पाठपुराव्यामुळे प्रथमच मोजक्या सुविधेत ही बॅच यशस्वीरित्या पार पडली. सदर प्रशिक्षण मा.श्री.मेंढे साहेब, तत्कालीन अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) तसेच श्री.अणे साहेब, अधीक्षक अभियंता, एचव्हीडीसी ग्र.के. संवसु प्रविभाग, चंद्रपुर, श्री.निंबाळकर साहेब, श्री.सारडे साहेब, श्री.रॉय साहेब यांच्या बहुमोल मार्गदर्शनाने आणि प्रशिक्षण समन्वयक श्री.उमेश भोंडे यांच्या अविरत प्रयत्नाने यशस्वीरित्या संपन्न झाले.

प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी मा.श्री.शिंदे साहेब, मुख्य अभियंता (मासंवि), श्री.मेंढे साहेब, तत्कालीन अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण), श्री.अणे साहेब, अधीक्षक अभियंता, एचव्हीडीसी ग्र.के. संवसु प्रविभाग, चंद्रपुर, श्री.निंबाळकर साहेब, श्री.सारडे साहेब, श्री.रॉय साहेब प्रामुख्याने उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी प्रशिक्षणार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. श्री.सरडे साहेबांनी त्यांच्या मार्गदर्शनात प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या पुढील आव्हाने आणि जबाबदारीबद्दल अवगत केले.

## Senior Officer's Retirement/Appointment in the Month of April- May

**Retirement**

| Sr. No. | Name | Designation | Place of Working | Date |
|---|---|---|---|---|
| 1 | Shri Shrikant N. Khindre | S.E.(Trans.) | EHV CC O&M, Zone Aurangabad | 30.04.2014 |

**Appointments**

| Sr. No. | Name | Designation | Place of Posting | Date |
|---|---|---|---|---|
| 1 | Shri Nimbalkar Avinash V. | S.E.(Trans.) | Training Section, C.O. Mumbai | 23.05.2014 |
| 2 | Shri Awghad Praful Bapurao | S.E.(Trans.) | STU, C.O. Mumbai | 23.05.2014 |
| 3 | Shri Ramteke B.H. | S.E.(Trans.) | ALDC, Ambazari | 23.05.2014 |
| 4 | Shri Atram Sanjay Laxmanrao | S.E.(Trans.) | EHV CC O&M, Zone Nashik | 23.05.2014 |
| 5 | Shri Bhagwat lM.B. | S.E.(Trans.) | ERP, C.O. Mumbai | 23.05.2014 |
| 6 | Shri Pathak Suresh Wamanrao | S.E.(Civil) | EHV CCM circle, Kolhapur | 23.05.2014 |
| 7 | Gaikwad Satish Gangaram | S.E.(Civil) | EHV CCM circle, Pune | 23.05.2014 |

## MENTORING – A tool of Knowledge Transfer




Organisation has a perpetual succession. Which means people may come and go, an organization shall remain. Thus there are newly joined employees and employees who are retiring. Keeping in mind this phenomenon it is important that organization make new breed of employee ready to shoulder responsibility of the role assigned to them.

It can be done in the formal set up of succession planning and a little informal set up by way of Mentoring. Mentoring is commonly known as guiding newly inducted employees by senior employee till they get integrated with the organization. Mentoring which I like to mention is an informal moral responsibility of senior officer to identify future role holder and guide them so that they are ready to take over that responsibility in future.

A senior officer learns from his seniors and this value chain has to continue such that he passes on his knowledge, wisdom and ability to judge, to his subordinate officers. Otherwise a peculiar situation arises where organization feels that employees are assigned role before they are ready. It slows down the pace of organization functioning. Therefore senior officers in the organization must perform his role in such a way that this aspect is taken care by them without notice, effortlessly.

Many successful orgnisation has considered this as an important aspect and inbuilt in the system by assigning "Subordinate Development" as KRA of senior officers of the organization, by default. Today we see organizations so creatively and innovatively handling employees' aspect. They have automated mechanical aspects of employees i.e. salary, claims, increments, promotions, grievances, rules and regulations, etc. and are focusing time and attention of the management on developing their capabilities, giving them exposure, grooming, guiding, coaching, integrating them with organization vision, mission and objectives, motivation, etc. These are intangible aspects but if handle properly gives enormous tangible values to the organization in terms of productivity, operation and financial results.

There is a difference between good and great organization. To become great is not that difficult, it requires an approach and sensibility. Therefore organization has to timely bring change in its approach and sensibility to the employees' issues. This is why many organizations have moved its employee approach from personnel administration to Human Resources Development. We see many public undertaking today have found place in great orgnisations. NTPC, Powergrid, Coal India, GAIL, ONGC, BPCL, HPCL, SBI, Bank of Baroda, PNB have succeeded in transforming them and they are known for their good practices. A modern business practices needs a modern approach to have compatibility, it will not work on traditional model.

Therefore I request senior officers while doing your work ensure all those who interact with them are able to understand subject matter well. In this process necessary guidance is required to be extended to them such that they are empowered. I am sure this will enhance capabilities of our employees and in turn of our organization.

**From the Desk of ED, HR**

संपादक : श्री.संदीप सुरवसे, व्यवस्थापक (मा.सं.), प्रभारी जनसंपर्क अधिकारी
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd., Printed at Hema Arts : 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221 & Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.